Australian Government

# रक्षाबंधन (राखी)
## जैविक सुरक्षा
मे 2024




## जैविक सुरक्षेसाठी महत्वाची माहिती

परदेशातील अन्न, वनस्पती सामग्री आणि प्राणी उत्पादने ऑस्ट्रेलियाला जगातील सर्वात हानिकारक कीटक आणि रोगांना आमंत्रण देऊ शकतात. यामुळे आपले अनोखे पर्यावरण, मौल्यवान शेती आणि पर्यटन उद्योग उद्ध्वस्त होऊ शकतात.

जर तुम्ही परदेशातून येत असाल किंवा परदेशी पाहुण्यांची वाट पहात असाल तर तुम्हाला, तुमच्या कुटुंबियांना, पाहुण्यांना भेटणे महत्वाचे आहे, पण त्यासाठी ऑस्ट्रेलियाच्या कडक जैविक सुरक्षा (बायोसिक्युरिटी) कायद्यांची माहिती असणं आवश्यक आहे.

जर तुम्ही मेलद्वारे (सी-मेल, एअरमेल, पोस्टपार्सल, इंटरनॅशनल मेल इ.) रक्षाबंधन भेटवस्तूंची अपेक्षा करत असाल तर तुमच्या कुटुंबियांना आणि परदेशातील मित्रांना सांगा की कुठल्याही प्रकारच्या गोष्टी मेल करण्यापूर्वी ऑस्ट्रेलियात परवानगी आहे की नाही हे तपासा. मेल केलेल्या गोष्टींवर पोस्टल डिक्लरेशन लेबलने सर्व सामग्रीची अचूक यादी लावणे आवश्यक आहे, जेणेकरून सीमेवर त्यांची तपासणी करणं शक्य होईल.

## आम्ही ऑस्ट्रेलियात प्रवेश करणाऱ्या जैविक सुरक्षा (बायोसिक्युरिटी) जोखमीच्या वस्तूंना कसा आळा घालतो?

ऑस्ट्रेलियात कीड आणि रोग आणू शकतील अशा गोष्टी ओळखण्यासाठी, सामान आणि आंतरराष्ट्रीय मेल केलेल्या गोष्टींची तपासणी केली जाते. यामध्ये जैविक सुरक्षा (बायोसिक्युरिटी) अधिकारी, प्रवाशांची चौकशी करणे किंवा एक्स-रे, डिटेक्टर कुत्रे आणि / किंवा मॅन्युअल तपासणी वापरुन वस्तूंची तपासणी करणे यांचा समावेश असू शकतो.

## जैविक सुरक्षिततेचा धोका निर्माण करणारी उत्पादने

जैविक सुरक्षिततेचा धोका निर्माण करू शकणाऱ्या रक्षाबंधन भेटवस्तूंमध्ये खालील गोष्टींचा समावेश आहे:

- बिया किंवा फुलांनी बनवलेले राखीचे धागे,
- पारंपारिक भारतीय मिठायांमध्ये दूध असते: जसे की बर्फी, म्हैसूर पाक, गुलाबजाम, रसगुल्ला, पेढा किंवा सोनपापडी
- बिस्किट्स, केक्स आणि ब्रेड, जे फ्रिज मध्ये ठेवावे लागतात
- सुकामेवा
- चहा आणि औषधी वनस्पती
- तृणधान्ये व कडधान्ये ज्यात तांदूळ, गहू, डाळी, हरबरा व बीन्स ( उदा. श्रावण घेवडा, चवळी )चा समावेश होतो.





## कीटक आणि रोगांपासून ऑस्ट्रेलियाचे रक्षण करण्यास मदत करा

- तुम्ही ऑस्ट्रेलियातच रक्षाबंधनाच्या भेटवस्तू खरेदी करा.
- ऑस्ट्रेलियात एखादी गोष्ट आणण्यापूर्वी किंवा मेल करण्यापूर्वी, त्यास परवानगी आहे की नाही हे खालील वेबसाइटद्वारा तपासा: agriculture.gov.au/mailing-bringing-goods वर क्लिक करा.
- परदेशातील तुमच्या कुटुंबियांना आणि मित्रांना सांगा की ते ज्या भेटवस्तू आणू इच्छित आहेत किंवा मेल करू पाहात आहेत त्या त्यांना आणायला/ पाठवायला परवानगी आहे कि नाही हे त्यांना तपासायला सांगा.

## ऑस्ट्रेलियाला प्रवास

ऑस्ट्रेलियाला प्रवास करताना खालील गोष्टी तुम्ही केल्याच पाहिजेत:

- तुम्ही अन्न, वनस्पती सामग्री किंवा प्राणी उत्पादने घेऊन येत आहात की नाही हे तुमच्या इनकमिंग पॅसेंजर कार्डवर प्रामाणिकपणे जाहीर करा. खोटी किंवा दिशाभूल करणारी माहिती देणे हा गंभीर गुन्हा आहे. वस्तू जाहीर न केल्यास जबरदस्त दंड होऊ शकतो.
- कोणत्याही अन्न, वनस्पती सामग्री किंवा प्राण्यांसाठी "होय" चिन्हांकित करा.

तुम्ही बाळगत असलेल्या वस्तूंची तुम्हाला खात्री नसल्यास, अधिकाऱ्याशी बोलण्यासाठी तुमच्या इनकमिंग पॅसेंजर कार्डवर "होय" चिन्हांकित करा.

तुमच्या भेटवस्तूंसह कोणत्याही गोष्टी तुम्ही स्वतःच पॅक केल्या पाहिजेत, ज्या तुम्हाला सामानाच्या शीर्षस्थानी जैविक सुरक्षा (बायोसिक्युरिटी) अधिकाऱ्याद्वारे तपासणीसाठी तयार ठेवाव्या लागतील व त्या घोषित केल्याच पाहिजेत.

घोषित केलेल्या वस्तूंवर प्रक्रिया करण्याची किंवा निर्यात करण्याची आवश्यकता असू शकते (तुमच्या खर्चाने), किंवा नष्ट करण्याचीही आवश्यकता असू शकते. परंतु जैविक सुरक्षेचा धोका नसलेल्या वस्तू मात्र तुम्हाला परत केल्या जातील.

तुम्ही जैविक सुरक्षा (बायोसिक्युरिटी) अधिकाऱ्याला किंवा इनकमिंग पॅसेंजर कार्डवर खोटी किंवा दिशाभूल करणारी माहिती दिल्यास किंवा तुम्हाला विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्यात अपयशी ठरल्यास, माल किंवा जैविक सुरक्षा (बायोसिक्युरिटी) अधिकाऱ्याने दिलेल्या निर्देशांचे पालन केले नाहीत तर खालील शक्यता निर्माण होतील:

- उल्लंघनाची नोटीस दिली जाईल
- दिवाणी दंडाच्या कारवाईसाठी तुम्ही पात्र ठराल, आणि / किंवा
- फौजदारी गुन्ह्यासाठी तुमच्यावर खटला चालवला जाईल.

तुमचा व्हिसा देखील रद्द केला जाऊ शकतो आणि तसे असल्यास, तुम्हाला ऑस्ट्रेलियामध्ये प्रवेश नाकारला जाऊ शकतो आणि तुम्हाला तीन वर्षांपर्यंत ऑस्ट्रेलियात प्रवेश नाकारला जाऊ शकतो. ऑस्ट्रेलियामध्ये परवानगी नसतानाही तुम्ही सर्व वस्तू घोषित केल्या आणि सादर केल्या तर तुम्हाला *जैविक सुरक्षा (बायोसिक्युरिटी) कायदा 2015* अंतर्गत दंड आकारला जाणार नाही.

फोन 1800 900 090 किंवा
+61 3 8318 6700 (ऑस्ट्रेलिया बाहेरून)

अधिक माहितीसाठी
agriculture.gov.au/travelling-mailing

Facebook (फेसबुक): Australian Biosecurity
Instagram: @australianbiosecurity

BIO078.0524